टायगर होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : युनिट क्र. 609 आणि 610, 6वा मजला, मॅजेस्टिक, लॉ गार्डन जवळ, पंचवटी रोड, एलिसब्रिज, अहमदाबाद, गुजरात - 380 006.
कॉर्पोरेट कार्यालय : 1004/5, 10वा मजला, सी-विंग, वन बीकेसी, सी-66, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-400051, महाराष्ट्र, भारत.
CIN : U65999GJ2017PTC098960, वेबसाइट : www.tygerhomefinance.in

ई-लिलाव व विक्रीसाठी जाहीर सूचना

टायगर होम फायनान्स प्रा. लि. (पूर्वी मे. अदानी हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे, दि. 6 जून 2024 रोजी कंपनीचे निबंधक कार्यालय, कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाने जारी केलेले इन्कॉर्पोरेशनचे प्रमाणपत्र नुसार, यापुढे 'टीएचएफपीएल' म्हणून संदर्भित) यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत, खालील कर्ज खात्यांमधील कर्जदारांकडून कर्ज देय वसुलीसाठी, येथे नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्याच्या अनुषंगाने, या मालमत्तेची **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे"** तत्त्वावर विक्री करण्याचा अधिकार आहे. खालील स्वाक्षरीकार यांच्यामार्फत **https://Tygerhome.procure247.com** या वेबसाइटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे विक्री केली जाईल, ज्याचे तपशील खाली दिले आहेत :

अ. क्र.	कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कर्ज करार क्र.	स्थावर मालमत्तेचे वर्णन	मागणी सूचना दिनांक / थकबाकी रक्कम (सुरक्षित कर्ज)	आरक्षित किंमत (आ. किं.) बयाणा रक्कम बोली वाढीव रक्कम
1.	**8010HL001185481 / अशफाक पीरमोहम्मद शाह**	पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्रमांक 1401 मध्ये स्थित, मालमत्ता मोजमाप 47.11 चौ. मी. म्हणजे 507.08 चौ. फू. (कार्पेट क्षेत्रफळ) चौदाव्या मजल्यावर सोबत "**सिल्व्हर ट्रेझर**" नावाच्या प्रकल्पाच्या "ए" विंग मध्ये एक कार पार्किंग, जमीन मोजमाप सुमारे 2 हे 82 आर पैकी जमीन मोजमाप सुमारे 80 आर संबंधित सर्व्हे क्रमांक 284 गाव, वडगाव, तालुका मावळ, जिल्हा पुणे, वडगाव (मावळ) गाव येथे स्थित, उप-नोंदणी जिल्हा लोणावळा अंतर्गत. ज्याची **चतुःसीमा पुढीलप्रमाणे : पूर्व** : जिना, **पश्चिम** : जिना, **उत्तर** : खुली जागा, **दक्षिण** : पॅसेज.	10-सप्टेंबर-25 रु. 2813114/- दिनांक 10-सप्टेंबर-25 रोजी नुसार	रु. 1574640/- रु. 157464/- रु. 1000/-

बयाणा सादरीकरण खाते तपशील (आ. किं. च्या 10%) एनईएफटी / आरटीजीएस	खाते क्र. : **ADANIH100EMDAHF001,** बँकेचे नाव : आयसीआयसीआय बँक लाभार्थीचे नाव : अदानी हाऊसिंग फायनान्स प्रा. लि., आयएफएससी कोड : **ICIC0000106**
ई-लिलाव दिनांक / वेळ	30-10-2026, सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 वा.
प्राधिकृत अधिकारी	हृषीकेश देशमुख - 9765117167

अटी व शर्ती :
ई-लिलाव "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" तत्वावर आयोजित करण्यात येईल.
1. साइटवर तपासणी **दि. 21-ऑक्टोबर-26 आणि 26-ऑक्टोबर-26 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 4.30 वा.** करता येईल.
2. ऑनलाइन बोली (बयाणा रक्कम) / ऑफर **दि. 14-ऑक्टोबर-26** रोजी सुरू होईल आणि **दि. 29-ऑक्टोबर-26 रोजी सायंकाळी 5:30** पूर्वी संपेल.
3. प्राधिकृत अधिकारीना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार तेथे कोणत्याही मालमत्तेवर भार नाही. तथापि, स्वास्थ्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलावात ठेवलेल्या मालमत्तेवरील भार, नामाधिकार तसेच मालमत्तेस प्रभावी ठरणारे दावे / हक्क / देणी यासंबंधित स्वतंत्र चौकशी करावी.
4. ज्या इच्छुक बोलीदारांनी ईएमडी जमा केला आहे आणि लॉगिन आयडी आणि पासवर्ड तयार करणे, डेटा अपलोड करणे, बोली सादर करणे, ई-बिडिंग प्रक्रियेचे प्रशिक्षण इत्यादीसाठी आवश्यक सहाय्य हवे आहे, त्यांनी **मे. आय-सोर्सिंग टेक्नॉलॉजीज प्रा. लि.,** 603, सहावा मजला शिखर कॉम्प्लेक्स, नवरंगपुरा, अहमदाबाद 380 009, गुजरात, भारत यांचेशी संपर्क साधावा. **ई-मेल आयडी : Karan@procure247.com, Rajesh@procure247.com, Tapan@procure247.com, सपोर्ट हेल्पलाइन क्र. : राजेश चौहान - 6354910183, करण मोदी - 7016716557. चौकशी : Helpdesk@procure247.com,** आणि कोणत्याही मालमत्तेशी संबंधित प्रश्नांसाठी प्राधिकृत अधिकारी : हृषीकेश देशमुख - 9765117167 ई-मेल आयडी **: hrishikesh.deshmukh@tyger.in** यांच्याशी सोमवार ते शनिवार कामकाजाच्या वेळेत संपर्क साधू शकता.
(तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया https://adanicapital.procure247.com/ या वेबसाइटला भेट द्या)
टीप : ही सूचना सरफेसी कायदा, 2002 अंतर्गत वैधानिक 15 दिवसांची विक्री सूचना आहे.

ठिकाण : महाराष्ट्र, दिनांक : 14.10.2026

स्वा/- प्राधिकृत अधिकारी, टायगर होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड करिता

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत मालक **श्री. राकेश अर्जुन गायकवाड,** वय-३७ रा.२९५, गंगानगर, लेन नं.१२, संस्कृती कॉलनी, फुरसुंगी, पुणे, ४१२३०८ व इतर यांचे मालकीची आहे.सदर मिळकत ही पूर्वी त्यांचे वडील कै. अर्जुन भिमराव गायकवाड यांचे मालकीची होती. कै. अर्जुन भिमराव गायकवाड यांनी सदर मिळकत ही भिकु लक्ष्मण सरोदे यांचेकडुन खरेदी घेतलेली असुन तसा खरेदीखाचा दस्त हा मे. दुय्यम निबंधक सो. हवेली-२ यांच्या कार्यालयात दिनांक ३१/०५/१९८८ रोजी अनुक्रमांक ८६१४/१९८८ अन्वये नोंदविलेला आहे. व सदर मुळ खरेदीखत हे कै. अर्जुन भिमराव गायकवाड यांचेकडेच होते. तद्नतर कै. अर्जुन भिमराव गायकवाड यांचे दिनांक ०२/११/२००९ रोजी निधन झाले असुन निधनानंतर सदर मुळ खरेदीखताचा दस्त हा त्यांचामुलगा म्हणजेच **श्री. राकेश अर्जुन गायकवाड** यांचेकडे होता. सबब त्यानंतर **श्री. राकेश अर्जुन गायकवाड** हे गंगानगर मधुन फुरसुंगी येथे जात असताना त्यांचेकडुन मुळ **खरेदीखत दस्त क्र. ८६१४/१९८८** गहाळ झालेले आहेत. त्यांनी त्याचा शोध घेतला असता सदर दस्त त्यांना आढळुन आलेले नाहीत. तशी दस्त गहाळ झालेबाबतची तकार फुरसुंगी पोलीस स्टेशन यांचेकडे लॉस्ट रिपोर्ट नं. १४९८२०-२०२६ अन्वये दाखल केलेली आहे. तरी सदरचा **मुळ खरेदीखत दस्त क्र. ८६१४/१९८८** हा दस्तऐवज कोणाला मिळाले असल्यास अथवा मिळाल्यास त्यांनी ते **श्री. राकेश अर्जुन गायकवाड** यांचे वरील नमुद पत्त्यावर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०८ दिवसाचे आत आणुन द्यावा. तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, तारण, अन्नवस्त्र, लिज, लिन, बक्षीस, मृत्युपत्र, जामीन, जप्ती, कूळ, वारस, करारनामा, जनरल मुखत्यार वगैरे बोजा असल्यास सदरहू नोटीस प्रसिद्ध झालेपासून **०८ दिवसांत** लेखी हरकत घेऊन साक्षांकीत कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व विनबोजाची आहे असे समजले जाईल. मागाहून कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच परस्पर वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व मुदतीनंतर आम्ही टायटल सर्टिफिकेट देऊ.
परिशिष्ट :- तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, मा. सब. रजि. साहेब हवेली १ ते २७ व पुणे जिल्हा यांचे हद्दीतील व फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद यांचे हद्दीतील **गाव मौजे फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे येथील सर्व्हे नंबर १७४ यांसी हिस्सा नंबर १४ड मधील क्षेत्र ५६ आर पैकी ०१ आर** ही मिळकत. यांसी चतुःसिमा येणेप्रमाणेः पुर्व रोड, दक्षिण श्री. रामचंद्र जर्वजळ यांची मिळकत, पश्चिम श्री. वेलगुंडे याची मिळकत, उत्तर- श्री. कृष्णा पोते यांची मिळकत.
पुणे दिनाक १३/१०/२०२६ अॅडव्होकेट मयूर एस. भिलारे
कार्यालय: **C** १०८ आणि **C** ११०, मेगा सेंटर, हडपसर, पुणे-४११ ०२८. मोबाईल: ७३५०४३७४७४.

TJSB SAHAKARI BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED BANK

नोंदणीकृत कार्यालय : टीजेएसबी हाऊस, प्लॉट नं. बी-५, रोड नं. २, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४. **फोन** : ०२२-६९९७ ८७३१.
प्रादेशिक वसुली कार्यालय : १ ला मजला, ६९२/६९३, चाफळकर सेंटर, चाफळकर कॉलनी, मार्केटयार्ड रोड, पुणे-४११०३७. **फोन :** ०२०-२४२२३५३१/३२, ७२०८९३२०३४, ७२०८९३१३३२

विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट)रूल्स २००२ मधील रुल ८(६) आणि रुल ९ च्या अटींनुसार स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता लिलाव विक्री सूचना.

या ठिकाणी सर्वसाधारण जनतेस आणि विशेषकरुन कर्जदार/गहाणखतदार आणि/किंवा जामीनदार यांना सूचना देण्यात येते की, खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/बोज्याअंतर्गत आहेत आणि टीजेएसबी सहकारी बँक लि. यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी सदर मालमत्तांचा सरफेसी ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(४) आणि सेक्शन (१४) अंतर्गत आदेशाची अंमलबजावणी करुन **ताबा** घेतला असून, सदर मालमत्तांची **''जसे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'', ''तेथे जे आहे''** आणि **''कोणत्याही फेरविचाराशिवाय'' आणि जंगम मालमत्तेसह** या तत्त्वावर खाली नमूद केलेले कर्जदार/गहाणखतदार/जामीनदार यांच्याकडून खाली नमूद परीशिष्टामधील येणे असलेली थकित रक्कम वसूल करण्यासाठी विक्री करण्यात येणार आहे.

कर्जदाराचे / जामीनदार/गहाणखतदाराचे नाव	स्थावर आणि जंगम मालमत्तेचे वर्णन व राखीव किंमत आणि अनामत रक्कम
१. मे. सिनर्जी हायटेक ॲग्रो...(कर्जदार/गहाणखतदार) २. श्रीमती. अनुराधा अशोक इनामदार ...(भागीदार/जामीनदार/ गहाणखतदार) ३. सौ. शैलजा संजय मोहिते ...(भागीदार/जामीनदार/गहाणखतदार) ४. सौ. रोहिणी संदिप माने ...(भागीदार/जामीनदार/ गहाणखतदार) ५. श्री. अभिजीत अशोक इनामदार ...(जामीनदार/गहाणखतदार) ६. श्री. संजय रघुनाथ मोहिते ...(जामीनदार) ७. श्री. संदिप सदाशिव माने ...(जामीनदार) ८. श्री. रघुनाथ दगडु मोहिते ...(जामीनदार) ९. सौ. रूपाली संदिप मोहिते ...(जामीनदार/गहाणखतदार) १०. सौ. सरिता सतिश मोहिते ...(जामीनदार/गहाणखतदार) ११. श्री. सुनिल सदाशिव माने ...(जामीनदार/गहाणखतदार) १२. सौ. अश्विनी अजय देशमुख ...(जामीनदार/गहाणखतदार) १३.श्री. अमोल अशोक इनामदार ...(जामीनदार/गहाणखतदार) पीआरओ-रिकव्हरी, पुणे, कर्ज खाते क्रमांक : ODSR/153140300000006, ECLGSTL1R/153307800000001 PRLNR/153302900000001 आणि ADVHYPR/153300700000001.	**लॉट नं. I** : पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग : नवीन गट नं. ७८२ (जुना गट नं. ७७३), मु.पोस्ट चितळी, ता. खटाव, जि. सातारा येथे, प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ २ हेक्टर आणि २२ आर पैकी, औद्योगिक बिगरशेतजमीनीचे क्षेत्रफळ ६१५९.५० चौ.मी., तसेच त्यावरील प्लान्ट आणि मशिनरी. **चतु:सीमा : पूर्वेस** : श्री. संजय रघुनाथ मोहिते यांची मालमत्ता, **पश्चिमेस** : श्री. नागरे पाटील यांची मालमत्ता, **दक्षिणेस** : जुना चितळी-म्हासुर्णे रस्ता, **उत्तरेस** : श्री. सतिश रघुनाथ मोहिते आणि नागरे पाटील यांची मालमत्ता. **(सौ. सरीता सतिश मोहिते आणि सौ. रूपाली संदिप मोहिते यांच्या मालकीची मालमत्ता).** **जमीन आणि इमारती आणि मशिनरीची** **एकत्रित राखीव किंमत : रू. १,९३,१०,०००.००** **एकत्रित अनामत रक्कम : रू. १९,३१,०००.००** **लॉट नं. II** : नवीन गट नं. ७८२ (जुना गट नं. ७७३), मु. पोस्ट चितळी, तालुका खटाव, जिल्हा सातारा येथे स्थित गहाणतारण असलेल्या प्लान्ट आणि मशिनरी **राखीव किंमत : रू. ८२,८७,०००.००** **अनामत रक्कम : रू. ८,२८,७००.००** भार (असल्यास) : सुरक्षित धनकोला याची माहिती नाही प्रलंबित देणी:- MSEDCL (वीज बिल) - सुरक्षित धनकोला याची माहिती नाही ग्रामपंचायत शुल्क - सुरक्षित धनकोला याची माहिती नाही **ताब्याची तारीख व ताब्याचा प्रकार : १६/०३/२०२६, प्रत्यक्ष ताबा** दि. २४/०७/२०२५ च्या मागणी नोटीसीनुसार एकूण येणे रक्कम : रु. ३,१६,९८,०००.७५ व दि. ३०/०९/२०२६ रोजी एकूण येणे रक्कम : रु. २,१५,८१,४०७.७५

लिलावाचे ठिकाण : टीजेएसबी सहकारी बँक लि.,	मालमत्ता पाहणी दिनांक व वेळ :	मालमत्तेच्या लिलावाचा दिनांक आणि वेळ :
प्लॉट नं. ३७०/२, २३४/३८, भट्टड कॉम्प्लेक्स, दत्त चौक, शनिवार पेठ, कराड, जिल्हा सातारा ४१५११०	दि. २७/१०/२०२६ स. ११.०० ते दु. २.००	: दि. ०४/११/२०२६ : स. १०.३० वाजता

टीप : जर आम्हाला वर नमूद केलेल्या दोन्ही लॉट (म्हणजेच लॉट नं. I आणि लॉट नं. II) साठी यशस्वी बोली मिळाली असेल तर फक्त लॉट I (जमीन आणि बिल्डींग, प्लान्ट आणि मशिनरी) साठी यशस्वी बोलीदाराला प्राधान्य दिले जाईल आणि लॉट II साठी म्हणजेच (फक्त प्लान्ट आणि मशिनरी) नाही.

अटी व शर्ती :
१) ठळकपणे **''सौ. सरीता सतिश मोहिते आणि सौ. रूपाली संदिप मोहिते यांच्या नावावरील जमीन आणि बिल्डींग आणि मे. सिनर्जी हायटेक ॲग्रो यांची प्लान्ट आणि मशिनरी खरेदीसाठी प्रस्ताव लॉट - I किंवा लॉट - II मे. सिनर्जी हायटेक ॲग्रो म्हणजेच नवीन गट नं. ७८२ (जुना गट नं. ७७३), मु. चितळी, तालुका खटाव, जिल्हा सातारा यांच्या नावावरील प्लान्ट आणि मशिनरी''** एका मोहोरबंद पाकिटातून प्रस्तावांना ठेवून सदर प्रस्ताबाचे मोहरबंद पाकिट वर नमूद लिलाबाच्या ठिकाणी **दि. ०३/११/२०२६ रोजी सायं. ५.०० पूर्वी आणावेत आणि दि.०३/११/२०२६ रोजी सायं. ५.०० पूर्वी** ईएमडी रक्कम **डीडी / पेऑर्डर / आरटीजीएस द्वारे टीजेएसबी सहकारी बँक लि., पुणे, खाते क्र. ००१९९५२०००००००२, आयएफएससी कोड TJSB0000001** मध्ये हस्तांतरित करावी.
२) निम्नस्वाक्षरीकारांकडून अशा तऱ्हेने प्राप्त झालेले प्रस्ताव उपरोक्त **लिलावाच्या ठिकाणी दि. ०४/११/२०२६ रोजी स. १०.३०** वाजता उघडून विचारात घेतले जातील.
३) प्लान्ट आणि मशीनरीवरील १८.००% जीएसटी यशस्वी प्रस्तावकाला अंतिम बोलीच्या वेळी भराबा लागेल.
४) कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे आणि / किंवा लिलाव रद्द करण्याचे आणि / किंवा सुधारण्याचे आणि / किंवा पुढे ढकलण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवले आहेत.
५) सर्व किंवा अशा कोणत्याही व्यक्ती (व्यक्तींना) या मालमत्तेबाबात वाटा, हक्क, शीर्षक, लाभ, व्याज, दावा किंवा मागणी यांच्या उक्त मालमत्तांच्या किंवा त्यांच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, वाटप, देवाणघेवाण, गहाण, भाडे, पोट-भाडे, भाडेपट्टी, धारणाधिकार, शुल्क, देखभाल, परवाना, भेटवस्तू, वारसा, वाटा, ताबा, सहजता, विश्वास, वसीयत ताबा, असाईनमेंट किंवा कोणत्याही स्वरूपाचा भार किंवा अन्यथा खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अधोस्वाक्षरीत लेखी कळवावे अशी विनंती केली जात आहे. जाहिरात प्रकाशित झाल्यापासून **७ दिवसांच्या आत** सर्व आवश्यक आणि सहाय्यक दस्तऐवजांसह, अशा दाव्याचा संदर्भ न देता कोणता व्यवहार पूर्ण केला गेला नाही तर अशा कोणत्याही व्यक्तीने त्याचे अधिकार माफ केले आहेत असे मानले जाईल आणि **टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड** वर बंधनकारक राहणार नाही.
६) अटी आणि शर्तींच्या पत्रकासह निविदा प्रपत्रे **रु. १००/- अधिक जीएसटी रु. १८/- एकूण रु. ११८/-** किंमतीसह प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या कार्यालयात स्वतंत्रपणे उपलब्ध आहेत. **(संपर्क क्रमांक - ७२०८९३२०३४/७२०८९३१३३२)**
७) बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे लिलाव निश्चित केला जाईल. बँकेने कोणताही व्यक्ती किंवा एजन्सी नियुक्त केलेली नाही.
८) लिलावाद्वारे विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती बँकेच्या **https://www.tjsb.bank.in/Auctions1** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
टीप: - ही वर नमूद केलेल्या कर्ज खात्याशी संबंधित कर्जदार/सह-कर्जदार/गहाणखतदार/जामीनदार यांना, वर नमूद केलेल्या तारखेस निविदा किंवा आपापसातील बोली द्वारे विक्री करण्याबाबत नियम ८(६) आणि नियम ९(१) अन्वये दिलेली १५ दिवसांची नोटीस देखील आहे.

सही/-
दिनांक : १३/१०/२०२६
ठिकाण : पुणे
मुख्य प्रबंधक व प्राधिकृत अधिकारी,सरफेसी ॲक्ट, २००२ अंतर्गत टीजेएसबी सहकारी बँक लि. साठी आणि त्यांच्या वतीने

* उपरोल्लेखित मराठी मजकुरामध्ये काही संदिग्धता असल्यास / आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

Hinduja Housing Finance Limited

कॉर्पोरेट कार्यालय : 167-169, दुसरा मजला, लिटल माउंट, सैदापेट,चेन्नई- 600015
इमेल आयडी: auction@hindujahousingfinance.com

नवीन शाखा कार्यालय – तिसरा मजला, पीकेपी एम्पायर, ५ वी गल्ली, शाहूपुरी, कोल्हापूर – ४१६००१, महाराष्ट्र. अधिकृत अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक : सचिन भालेकर (ZRM) – 8779984037, गणेश पाटील (RRM) – 9372403099, श्री. रितेश गवई (RLM) – 9011858221, श्री. ऋषिकेश उभाळे (ALM) – 9823244498

(सरफेसी कायदा) नियम, 2002 अंतर्गत खाजगी करार-सह-ई-लिलावाद्वारे स्थावर मालमत्तेच्या विक्रीची सूचना

याद्वारे कर्जदार व सह-कर्जदार यांना सूचित करण्यात येते की हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कर्जदारांकडून घेणे असलेल्या थकबाकीच्या वसुलीसाठी **सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२** अंतर्गत खाली नमूद अनामत मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतल्यानंतर आम्ही आपणांस याद्वारे सूचित करत आहोत की आपण सदर सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपण प्राप्त केलेल्या कर्जाशी संबंधित कर्ज करार आणि इतर दस्तावेजांमधील अटी व शर्तींनुसार संपूर्ण थकबाकी रकमेचा भरणा करावा. १५ दिवस लोटल्यानंतर, आपणांस पुढील सूचना देण्यात येणार नाही आणि खाली नमूद अनामत मत्तेची खाजगी वाटाघाटीच्या माध्यमातून विक्री करण्यात येईल. खाली नमूद अचल मालमत्तेची ज्ञात किंवा अज्ञात अशा सर्व वर्तमान व भावी बोज्यांसह "जशी आहे जेथे आहे", **"जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे"** तत्त्वावर विक्री करण्यात येईल. तपशील खालीलप्रमाणे आहे:-

तपासणीची तारीख :	ईएमडी जमा करण्याची अंतिम तारीख :	ई-लिलाव दिनांक/वेळ :
:-28.10.2026 (सकाळी 11.00 ते दुपारी 14.00 वाजेपर्यंत)	**29.10.2026** सायंकाळी 5 वाजेपर्यंत.	**30.10.2026** सकाळी 11.00 ते दुपारी 13.00 वाजेपर्यंत.

कर्जदार / सह-कर्जदार / जमानतदार	अचल मालमत्तेचे वर्णन	आरक्षित किंमत / ऑफर किंमत
कर्ज खाते क्र. MH/KLP/KLPR/A000002121 1. श्रीमती मृणाली अवधूत सोरटे (कर्जदार) 2. श्री. अवधूत अशोक सोरटे (सह-कर्जदार)	सर्व भाग आणि तुकडा, बांधकामासह मिळकत, फ्लॅट युनिट क्र. 202, कार्पेट क्षेत्रफळ 58.64 चौ. मीटर, बिल्ट-अप क्षेत्रफळ 70.36 चौ. मीटर, "दातार रेडियंट प्लाझा" या बहुमजली इमारतीमधील, सिटी सर्व्हे क्र. 159, क्षेत्रफळ 32.60 चौ. मीटर, सी.एस. क्र. 160, क्षेत्रफळ 25.9 चौ. मीटर, सी.एस. क्र. 161, एकूण क्षेत्रफळ 359.5 चौ. मीटर, त्यापैकी 265.82 चौ. मीटर क्षेत्रफळ, एकत्रित एकूण क्षेत्रफळ 324.32 चौ. मीटर, झेंडा चौक, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे स्थित. मिळकतीची चतुर्सीमा :- पूर्वेस :- सामायिक जिना, पश्चिमेस :- सी.एस. क्र. 164, दक्षिणेस :- बाजूची मोकळी जागा व सी.एस. क्र. 163, उत्तरेस :- बाजूची मोकळी जागा व फडणीस अपार्टमेंट	**रु. 18,00,000/- (रुपये अठरा लाख फक्त).** **ई.एम.डी.रक्कम: रु. 1,80,000/- (रुपये एक लाख ऐंशी हजार फक्त) बोली वाढ रक्कम : रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)** प्रत्यक्ष ताबा दिनांक – **21.08.2026**

1. मालमत्तेची विक्री **"जशी आहे जिथे आहे" (AS IS WHERE IS) आणि "जशी आहे तशी" (AS IS WHAT IS)** या तत्त्वावर करण्यात **येईल. 2.** इच्छुक खरेदीदाराने अर्जासोबत ऑफर केलेल्या रकमेच्या 10% रक्कम तसेच KYC कागदपत्रे जमा करणे आवश्यक आहे. ही रक्कम ऑफर स्वीकारल्यानंतर भरावयाच्या 25% रकमेचा भाग म्हणून समायोजित केली जाईल. **3.** HHFL कडून ऑफर स्वीकारल्यानंतर, यशस्वी खरेदीदाराने पुढील कामकाजाच्या दिवशी विक्री मूल्याच्या 25% रक्कमेचा (सुरुवातीस जमा केलेल्या 10% रकमेसह) भरणा करणे आवश्यक आहे. **4.** उर्वरित 75% विक्री मूल्याचा भरणा त्यानंतर 15 दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे. **5.** निर्धारित कालावधीत रकमेचा भरणा न केल्यास, सुरुवातीस जमा केलेल्या 10% रकमेसह जमा केलेली संपूर्ण रक्कम जप्त करण्यात येईल. **6.** HHFL ने ऑफर स्वीकारली नाही तर सुरुवातीस जमा केलेली 10% रक्कम कोणतेही व्याज न देता परत करण्यात येईल. **7.** रु. 50,00,000/- पेक्षा जास्त बोली रकमेच्या बाबतीत, यशस्वी खरेदीदाराने आयकर अधिनियमाच्या कलम 194-IA अंतर्गत लागू असलेला 1% TDS जमा करणे आवश्यक राहील. **8.** मालमत्ता विद्यमान तसेच भविष्यात उद्भवणाऱ्या सर्व ज्ञात अथवा अज्ञात बोजे, दावे, हक्क व दायित्वांसह विकली जाईल. अशा कोणत्याही तृतीय पक्षाच्या दावे, हक्क किंवा थकबाकीसाठी HHFL जबाबदार राहणार नाही. **9.** इच्छुक खरेदीदाराने मालमत्तेबाबत सर्व बाबींची स्वतंत्रपणे पडताळणी (Due Diligence) करावी. विक्रीनंतर कोणत्याही प्रकारचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. **10.** कोणतेही कारण न देता कोणतीही ऑफर नाकारण्याचा अधिकार HHFL कडे राखीव आहे. **11.** लिलाव/बोली प्रक्रिया ही केवळ "ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक पद्धतीने" **https://www.bankeauctions.com** या संकेतस्थळावर किंवा सेवा प्रदाता **M/s C1 India Pvt. Ltd.** यांच्या ई-लिलाव पोर्टलद्वारेच आयोजित करण्यात येईल. **12.** बोलीदारांना त्यांच्या पसंतीच्या ठिकाणावरून ऑनलाइन पोर्टलद्वारे सहभागी होता येईल. इंटरनेट कनेक्टिव्हिटी किंवा तांत्रिक अडचणींसाठी सुरक्षित कर्जदाता अथवा सेवा प्रदाता जबाबदार राहणार नाही. **13.**ई-लिलावासंदर्भातील अधिक माहितीसाठी इच्छुक बोलीदारांनी सेवा प्रदाता **M/s C1 India Pvt. Ltd. यांच्याशी संपर्क साधावा. त्यांचे कॉर्पोरेट कार्यालय ई-लिलाव सेवा प्रदाता : प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर-44, गुरुग्राम – 122003, हरियाणा. संपर्क व्यक्ती : बाळाजी मन्नूर मोबाईल क्र. : +91-7977701080 ई-मेल : Mannur.govindarajan@c1india.com सपोर्ट ई-मेल : support@bankeauctions.com सपोर्ट (हेल्पलाईन) मोबाईल क्र. : +91-7291981124 / 25 / 26 सपोर्ट संकेतस्थळ : https://www.bankeauctions.com 14.** ई-लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक बोलीदारांनी **www.bankeauctions.com** या संकेतस्थळावर आगाऊ नोंदणी करून युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करावा. सेवा प्रदात्याकडून पासवर्ड प्राप्त होताच तो त्वरित बदलण्याचा सल्ला देण्यात येतो. **15.** ई-लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक बोलीदारांनी परतफेडयोग्य इस्ट मनी डिपॉझिट (EMD) म्हणून राखीव किमतीच्या 10% रकमेचा भरणा "Hinduja Housing Finance Limited" यांच्या नावे डिमांड ड्राफ्ट/NEFT/RTGS द्वारे करणे आवश्यक आहे. **16.** इच्छुक पक्षांनी अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक तपशील प्राप्त करावेत व ऑफर, EMD आणि KYC कागदपत्रे दिनांक **29/10/2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत** सादर करावीत. **17.** यशस्वी खरेदीदारास मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, कर तसेच खरेदीशी संबंधित इतर सर्व कायदेशीर व वैधानिक खर्च स्वत:च्या खर्चाने भरावे लागतील. **18.** SARFAESI अधिनियमाच्या कलम 13(8) अंतर्गत कर्जदार/तारणदार यांना असलेला मालमत्ता विमोचनाचा (Right of Redemption) अधिकार, प्रचलित न्यायालयीन निर्णयांनुसार या विक्री सूचनेच्या प्रकाशन दिनांकापासून समाप्त मानला जाईल. **19.** ही विक्री SARFAESI अधिनियम तसेच त्याअंतर्गत लागू नियमांच्या तरतुदींनुसार करण्यात येईल. अधिक माहितीसाठी कृपया वरील कार्यालयीन पत्त्यावर नमूद केलेल्या अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

ठिकाण : कोल्हापूर , तारीख: 14.10.2026

प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी, हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लि.

जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि.

कॉर्पोरेट ऑफिस / हेड ऑफिस : जीआयसीएचएफएल, नॅशनल इन्शुरन्स बिल्डिंग 6वा मजला, 14, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई - 400020.
दूरध्वनी क्र. 022-43041900. ईमेल : corporate@gichf.com **वेबसाइट :** www.gichfindia.com
- हिंजवडी शाखा - पुष्पक बिझनेस हब, ऑफिस क्र. 104, पहिला मजला, भूमकर चौक, वाकड, पुणे-411057.
शाखेचा ईमेल : hinjawadi@gichf.co.in प्राधिकृत अधिकारी : राजेंद्र गिरी : 9552161428 / अमेय मैरल : 9834833606.

ई-लिलाव विक्री सूचना

ई-लिलाव तारीख : 17-11-2026 / बोली सादर करण्याची शेवटची तारीख : 16-11-2026.

ज्याअर्थी, जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. (जीआयसीएचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी, सुरक्षा हित (अमंलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 यासह वाचलेल्या कलम 13 (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत आणि वित्तिय मत्तेची सुरक्षितता व पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा, 2002 ची अंमलबजावणी अंतर्गत, उक्त सूचनांमध्ये नमूद केलेल्या अदत्त देय रकमेची परतफेड करण्याकरिता खालील ऋणको / गहाणदार मागणी सूचना निर्गमित केली आहे. तथापी, ऋणको / ग